5-12-13

# कायम विना अनुदान तत्वावरील माध्यमिक शाळा परवानगीचे आदेश

## महाराष्ट्र शासन

क्रमांक: नमाशा १००४/(५३०/०४) /माशि-१
शालेय शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२
दिनांक: २३ ऑगस्ट, २००४

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक
पुणे./बृहन्मुंबई /कोल्हापूर/औरंगाबाद./
नगापूर/अमरावती/लातूर .

विषय:- २००४-२००५ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : शासन निर्णय , क्र. एसएसएन-२१०३/(५०/०३)/ माशि -२ दि. २७ मे, २००३

नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन सोबत जोडलेल्या परिप्रत्रका मध्येनमूद केलेल्या (३६) शैक्षणिक संस्थांना, त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून कायम विनाअनुदान तत्वावर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास या आदेशान्वये शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर संस्थांना माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबीची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.:-

(अ) या नवीन माध्यमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्यात आली असून, भविष्यात कधीही अनुदान, तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

(ब) सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

(क) शासनाच्या पूर्वपरवानगीचे निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.

(ड) संस्थेच्या अध्यक्षाकडून कायम विना अनुदान तत्वावर माध्यमिक शाळा चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र घेऊन ते स्वतंत्रपणे जतन करुन ठेवावे.

(इ) सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

(ई) " कायम विना अनुदान तत्वावर परवानगी मिळालेली शाळा " असा फलक अशा शाळेने ठळक अक्षरात दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा त-हेने लावणे संबधित संस्थेवर बंधनकारक राहील.

(फ) सदर कायम विना अनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने संबंधित अधिका-यांशी/ शासनाशी पत्रव्यवहार करतांना " कायम विनाअनुदानित शाळा " अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

(ग) सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निर्घणाऱ्या आदेशांचे (उदा.विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत) काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

ह) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही वा विद्यार्थ्यांच्या फीच्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशायाचे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीचे लेखी हमीपत्र संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांनी मागवून घेऊन कायम स्वरुपाचे कागदपत्र म्हणून ते सुरक्षितपणे जतन करुन ठेवावे.

३. ही परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्तता केल्याची खात्री करुन,संबंधित नवीन माध्यमिक शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१) संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२) सदर संस्थे मार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

३) " कायम विना अनुदान " तत्वावरील शाळांच्या नोंदवहीत नोंद घेण्यात यावी.

४. विहित शर्तीची व अटींची पूर्तता केल्याची काटेकोरपणे पडताळणी केल्यानंतरच माध्यमिक शाळांना परवानगी दिली जाईल,तसेच **संबधित संस्थेकडून कायम विनाअनुदान तत्वावर शाळा चालविण्यास तयार असल्याचे व भविष्यात कधिच शासना कडून अनुदान मागणार नसल्याचे शपथपत्र प्रथमतः घेतल्यानंतरच, संस्थेस माध्यमिक शाळा परवानगी दिली जाईल, अशी दक्षता विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी घ्यावी.**

५. याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच सदर माध्यमिक शाळेस परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल शासनास त्वरित सादर करण्यात यावा.

(मा. आ. गुट्टे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :माहिती व पुढील कार्यवाहीकरीता अग्रेषित :-
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
मा.शालेय शिक्षण मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
निवड नस्ती,

My Documents\AAAAA2

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३० | श्री गुरुदत्त शिक्षण प्रसारक संस्था, करंजी ता. दिंडोशी जि. नाशिक. | करंजी ता. दिंडोशी जि. नाशिक | मराठी | ८ वी |
| ३१ | श्री पार्श्वनाथ प्रज्ञालय, तळेगांव दाभाडे ता. मावळ जि. पुणे | तळेगांव दाभाडे ता. मावळ जि. पुणे | इंग्रजी | ८वी |
| ३२ | श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळ, न्यू. ति-हेगांव फॉरेस्ट, सोलापूर | न्यू. ति-हेगांव फॉरेस्ट, सोलापूर | मराठी | ८वी |
| ३३ | लार्ड बुध्दाज साष्टीपुत्र ज्ञान प्रसारक मंडळ, ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर | वायगांव ता. ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर | मराठी | ८वी |
| ३४ | जयक्रांती शिक्षण प्रसारक मंडळ, कव्हा ता. जि. लातूर | रेणापूर जि. लातूर | मराठी | ८वी |
| ३५ | जयक्रांती शिक्षण प्रसारक मंडळ, कव्हा ता. जि. लातूर | एम.आय.डी.सी. लातूर. | इंग्रजी | ८वी |
| ३६ | नवयुवक शिक्षण संस्था, लातूर | अंकुलगा (स) ता. शिरुर अंनतपाळ जि. लातूर. | मराठी | ८वी |

XXXXXXXXX